■ केतकी घाटे

# तुम्ही 'बि'घडाना!

**इकॉलॉजिकल सोसायटीतर्फे 'नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' हा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविला जातो. दर वर्षी जुलैमध्ये तो सुरू होतो. या उपक्रमाविषयी...**



प्रकाश गोळे यांनी १९९८ साली इकॉलॉजिकल सोसायटीतर्फे एक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला. 'नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' असे या कोर्सचे नाव. गेली तीन वर्षे आम्ही काही जण मिळून डॉ. स्वाती गोळे यांच्या बरोबरीने हा अभ्यासक्रम राबवत आहोत. विविध क्षेत्रांतील व्यावसायिक, अभियंता, डॉक्टर, वकील, निवृत्त, गृहिणी...अशा सर्वांसाठी हा एकात्मिक अभ्यासक्रम खुला आहे. दर वर्षी जुलैच्या पहिल्या शनिवारी हा कोर्स सुरू होतो आणि एप्रिलपर्यंत चालतो. दर शनिवारी ३ ते ८ या वेळेत दोन व्याख्याने, चार निवासी अभ्यास सहली आणि मोजक्या रविवारी अभ्यासभेटी असे या कोर्सचे स्वरूप. या कोर्सचा मुख्य पायाच 'दृष्टिकोन' घडवणे, 'निसर्ग आणि माणूस' यातले नक्की नाते काय, हे पोहोचवणे हा आहे. केवळ झाडे लावणे हा उपाय नाही, हे पोहोचवणे आहे. संवर्धनाची सुरुवात स्वत: एक 'विवेकी उपभोक्ता' बनून करावी लागेल, हे उमजणे आहे. प्रत्यक्ष जमिनीवर काम करायचे तर 'परिसर नियोजना'चे महत्त्व सांगणे आहे. प्रत्येक क्षेत्रात काम करताना 'सर्वंकष विचार' करणे का गरजेचे, हे पोहोचवणे आहे. यातल्या अभ्यास सहली या विशेष महत्त्वाच्या. मनोरंजनाच्या पलीकडे जाऊन निसर्गाकडे बघायचे कसे हे इथे शिकता येते. तिथली नैसर्गिक संसाधने,

## निमित्त

प्रक्रिया, जीव-विविधता, त्यांच्यातले परस्पर संबंध समजून घेण्यास मदत होते. पक्षी-कीटकांना स्थिती दर्शक म्हणून आपण बघायला शिकतो. प्रत्येक परिसंस्थेत माणूस आजूबाजूचा निसर्ग कसा वापरतो हे आपण समजून घेतो. मुख्य म्हणजे त्याचा निसर्गावर काय परिणाम होतो आहे, याचे विश्लेषण करायला शिकतो.

या सगळ्यातून निंसर्ग संवर्धनाकरता काय करायला हवे हे उमजते. पर्यावरणीय पुनरुज्जीवनाची आणि जैवविविधतेच्या संवर्धनाची निकड यातून लक्षात येते. हे नक्की कसे साधायचे, याची काही उदाहरणे इथे समजतात. या अनुभवावर आधारित उपाययोजना करण्याची मुभा प्रत्येकाला आहे.

इथे प्रत्येकाला स्वत:च्या पूर्व अनुभवानुसार या सगळ्या गोष्टी उमगतात. काही कोरी पाटी घेऊन आलेल्यांना दिव्य साक्षात्कार होतो, तर आधीच दोन पायऱ्या चढलेल्यांना आपल्या दिशेची शहानिशा करता येते. जे अजून पुढे आहेत अशांना हा विचार दहा लोकांपर्यंत पोहोचवण्याकरता पाया मिळतो.

एकंदर सगळ्यांना आपल्यासारखेच अजून आहेत, हा आधार मिळतो. पुढच्या 'कामाकरता' किंवा काम 'न' करण्याकरता प्रोत्साहन मिळते. दर वर्षी येणाऱ्या प्रतिसादावरून या अभ्यासक्रमाच्या दिशेची खात्री पटते आहे. जवळ जवळ प्रत्येक जण काही ना काही बदल करू इच्छित आहे.

चित्रकार आभाच्या चित्रात देशी झाडे आणि पक्षी आले, आणि अजूनही बरेच काही. लेखक असलेल्या चिन्मयच्या लिखाणात परिसर आणि माणूस या नात्याची सजग वर्णने आली. कायदातज्ज्ञ गौरीच्या पीएचडीतल्या कायदा-धोरण आखणीत सर्वंकष विचार आला. अभियंता भूषणच्या वास्तूरचनेच्या सेवा-सल्ल्यात ऊर्जेचा विचार आला. वित्तीय क्षेत्रातल्या पल्लवीने सीएसआर माध्यमातून संवर्धन कसे करता येईल, याकरता कंपनी सुरू केली. अनुराधा-मैत्रेयी-प्राजक्ता पारंपरिक घर बांधणीचा प्रचार करत आहेत. गोळे सरांनी त्यांच्या पद्धतीने इकॉलॉजिकल सोसायटीची आणि विचारांची उभारणी केली. या दृष्टिकोनाला स्वानुभवाची जोड देत हा विचार पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. या वर्षीच्या अभ्यासक्रमासंदर्भातील अधिक माहितीसाठी संपर्क- ०२०-२५६७७३१२, ९८२२४१२२७४

**(लेखिका इकॉलॉजिकल सोसायटीच्या समन्वयक आहेत.)**

महाराष्ट्र टाइम्स, ४ जुलै २०१६